आम्हा महिलांना अंतिम संस्कार वर जाण्यास मनाई करण्यात आली होती, परंतु या बाबत सक्तीचे बंधन नव्हते

अतिया अंसारी रजिअल्लाहु अनहा सांगतात की: आम्हा महिलांना अंतिम संस्कार वर जाण्यास मनाई करण्यात आली होती, परंतु या बाबत सक्तीचे बंधन नव्हते.
[صحيح] [متفق عليه]

उम्मे अतिया अंसारी रजिअल्लाहु अनहा सांगत आहे की प्रेषितांनी {सलामती असो} मयत सोबत जाण्यास महिलांना मना करण्यात आले. कारण स्पष्ट आहे की महिला फारच कोमल ह्रदय व मउ स्वभावी असतात, त्यांच्याजवळ पुरुषा सारखा खंबीर पणा व संयम पणा, तसेच संकटसमयी झटण्याची व त्याला सहन करण्याची शक्ती नसते, जर त्या मयत सोबत गेल्यास आकाडतांडव माजवतील किंवा मयत व दफन विधी पाहुन स्वतः वरचा ताबा सोडतील,व त्यामुळे त्या किचकट परिस्थितीत सामोरे जातील.परंतु उम्मे अतिया अंसारी रजिअल्लाहु अनहा नि अंदाज लावला की महिलांना प्रेषितांनी [सल्लल्लाहु अलैही व सल्लम]मयत सोबत जाण्यास सक्तीची मनाई केली नाही.

http://sunnah.global/hadeeth/mr/show/3228